# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

**पत्र**

विषयः- **वनजमिन रायगड**

क्षेत्र 0.1911 हे. वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत पोच रस्ता अंडर ग्राऊंड इलेक्ट्रीक लाईन व पाण्याची पाईप लाईन.

जावक क्र. ब/20/जमिन/6347/2018-19.

अलिबाग- 402 201, दिनांकः 11 /01/2019.

प्रति,

श्री. सागर खारपाटील,

मे.पी.पी. खारपाटील कन्ट्रक्शन प्रा.लि.,

मु.पो. चिरनेर, ता. उरण,

जिल्हा रायगड

संदर्भः- 1) केंद्रशासनाकडील पत्र क्र. एफसी-I/एमएच-117/2018-एनजीपी/4733, दिनांक 02 जानेवारी, 2019.

2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/4252, दिनांक 07/01/2019.

3) आपलेकडील पत्र दिनांक 10/01/2019.

आपले मौजे विंधणे सर्व्हे नंबर 221 व मौजे चिरनेर या गावांतील सर्व्हे नंबर 268, 269 मधून जोडरस्ता व 6" व्यासाची जी.आय. भुमिगत पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक केबल टाकणेकरीता 0.1911 हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्तावास संदर्भिय पत्रान्वये केंद्रशासनाने काही अटी व शर्तींचे अधिन राहून तत्वतः मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये अटी व शर्तीची पूर्तता करणेकरीता कळविण्यात आलेले होते.

प्रस्तुत प्रकरणी केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून पर्यायी वनीकरण व नक्त वर्तमानमुल्याचे रक्कमेबाबत आक्षेप घेण्यात आल्याचे आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये कळवून त्यामध्ये दुरुस्ती करुन सुधारीत पत्र मिळणेबाबत विनंती केली आहे. त्या त्यानुसार पर्यायी वनीकरण व नक्त वर्तमानमुल्याचे रक्कमेत सुधारणा करणेत येवून खालील प्रमाणे सुधारीत पत्र देण्यात येत आहे. तरी खालील प्रमाणे तत्वतः मंजूरी पत्रांतील अटींची पूर्तता करुन अहवाल सादर करणेची कार्यवाही करावी.

1) **अट क्रमांक- 1** – प्रस्तावांत मागणी केलेल्या वनाचा दर्जा कायम राहणार आहे, ही अट मान्य असल्याबाबत बंधपत्र पुर्तता अहवाला समवेत सादर करणेत यावे.

2) **अट क्रमांक- 2 व 3** – सदर प्रस्तावांत वळती होणारे क्षेत्रांत जरी वृक्षतोड होणार नसली तरी. सदर अटीनुसार प्रस्तावीत केलेल्या अवनत क्षेत्रांवर वनीकरण घेणेकरीता सन 2018-19 आर्थीक वर्षासाठी रक्कम रु. 5,46,176/- प्रति हेक्टर या प्रमाणे 1.00 हेक्टर वनेत्तर क्षेत्रावर पर्यायी वनीकरणाची योजना राबविणेकरीता रक्कम रु. 5,46,176/- (रक्कम रु. पाच लाख सेहेचाळीस हजार एकशे श्याहत्तर मात्र) अवश्यक आहे. सदर रक्कम www.forestclearance.nic.in या संकेत स्थळावर लॉगईन करुन चलन जनरेट करुन भरणा करावी व भरणा केलेले चलनाची प्रत या कार्यालयास पुर्तता अहवाल समवेत पाठविण्यात यावी.

3) **अट क्रमांक 4** – वळते होणारे क्षेत्र 0.1911 हेक्टर ची नेट प्रेझंट व्हॅल्यूची रक्कम 7,30,000/- याप्रमाणे रु. 1,39,503/-. (रुपये एक लाख एकोणचाळीस हजार पाचशे तीन मात्र) एवढी भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम www.forestclearance.nic.in या संकेत स्थळावर लॉगइन करुन चलन जनरेट करुन भरणा करावी व भरणा केलेले चलनाची प्रत या कार्यालयास पुर्तता अहवालसमवेत पाठविण्यात यावी.

4) **अट क्रमांक 5** - नुसार मा. सुप्रिम कोर्टाने नियुक्त केलेल्या एक्सपर्ट कमिटीचे शिफारसी प्रमाणे अधिकची नेट प्रेझेंट व्हॅल्यू रक्कम भरणेस तयार असल्याबाबत बंधपत्र (Undertaking) देणे आवश्यक आहे.

5) **अट क्रमांक 6-** प्रकल्प अंतर्गत भरणा करावयची सर्व रक्कम राज्य सरकारचे कॅम्पा बचत खात्यामध्ये ऑनलाईन वळती करुन जमा करण्यात यावा.

5) **अट क्रमांक 7-** प्रकल्प यंत्रणेने उक्त प्रकल्पाकरीता पर्यावरण (संवर्धन) अधिनियम, 1986 अंतर्गत पर्यावरण नाहरकत आवश्यक असल्यास, सदर परवानगी प्राप्त करुन त्याची प्रत पुर्तता अहवाला समवेत सादर करावी.

6) **अट क्रमांक 8-** प्रस्तावीत कामासाठी वळतेकरण करावयाचे क्षेत्र हे जागेवर 4 फुट उंचीचे पक्के सिमेंट पिलर्स लावून व त्यावर मागे व पुढे अनुक्रमांक व पिलर्स मधील अंतर नमुद करुन सिमांकीत करावे. सदर काम हे प्रकल्प यंत्रणेने त्यांचे स्वतःचे खर्चाने करणेचे आहे.

7) **अट क्रमांक 9-** मृदसंधारणाचे काम ज्या-ज्या ठिकाणी करणे आवश्यक वाटेल त्या त्या ठिकाणी प्रकल्प यंत्रणेने त्यांचे खर्चाने वन विभागाचे मागदर्शनाखाली करणेचे आहेत. त्याकरीता योजना तयार करुन पुर्तता अहवालासमवेत सादर करणेत यावी.

8) **अट क्रमांक 10-** कोणत्याही प्रकारे वनक्षेत्रांत मजूर कॅम्प उभारता येणार नाही.

9) **अट क्रमांक 11**- सदर प्रस्तावीत कामाचे बांधकामाकरीता जे मजूर व कर्मचारी कार्यरत असतील त्यांना यथायोग्य इंधन पुरविण्यात यावे जेणेकरुन निकटचे वनक्षेत्रातील वृक्षांची हानी होणार नाही याची दक्षता घेणेची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

10) **अट क्रमांक -12**- प्रकल्पासाठी वापरण्यात येणारा माल हा रोडचे आखणी मार्गाचे बाहेर टाकणेत येऊ नये. तसेच प्रकल्पाकरीता लागणारी माती व इतर माल हा कोणत्याही प्रकारचे वनक्षेत्रांतून आणला वा वापरला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

11) **अट क्रमांक -13**- ज्या कामाकरीता वनक्षेत्र वळतीकरण करण्यात येणार आहे त्याच कामाकरीता वनक्षेत्राचा वापर करणे बंधनकारक आहे.

12) **अट क्रमांक** -14- प्रस्तावातील मंजुर ले आऊट प्लॅन केंद्रशासनाची पुर्व मंजूरीशिवाय बदलता येणार नाही याची नोंद घ्यावी.

13) **अट क्रमांक -15**- प्रकल्प यंत्रणेस मान्य करण्यात आलेले वळतीकरण वनक्षेत्र कोणत्याही परिस्थितीत इतर यंत्रणा वा व्यक्ती यांना केंद्रशासनाचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतर करता येणार नाही.

14) **अट क्रमांक -16**- सदर प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारे वन व वन्यजीवांना हानी वा नुकसान पोहोचणार नाही याबाबत प्रकल्प यंत्रणेने दक्षता घ्यावी.

15) **अट क्रमांक-18**- वनक्षेत्रांतील कमीत कमी वृक्षांची तोड होईल याची दक्षता घ्यावी. तसेच वनक्षेत्रांतील वृक्षतोड ही वनविभागाचे निर्देशानुसार व देखरेखीखालीच करण्यात यावी.

16) **अट क्रमांक-19**- वन हक्क अधिनियम, 2006 नुसार जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत उप विभागीय स्तरावरील समितीचा अहवाल पूर्तता अहवालासमवेत तसेच पर्यावरण व वन मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. 11-9/1998-एफसी(pt) दिनांक 03/08/2009 आणि 05.07.2013 नुसार सादर करणेची कार्यवाही करावी.

17) **अट क्रमांक 20**- प्रस्तावीत प्रकल्पामुळे सदर क्षेत्रांतील पक्षी/वन्यजीवांचे वसतीस्थान नष्ट होणार असल्याने प्रकल्प यंत्रणेने सदर वन्यजीव/पक्षी यांचे वसतीस्थान अबाधीत राहणेकरीता व कृत्रीम घरटी तयार करून ती सदर प्रकल्पाचे आजुबाजुचे वनक्षेत्रांत प्रकल्प यंत्रणेने त्यांचे स्वतःचे खर्चाने लावणेची कार्यवाही वनविभागाचे मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक राहील.

18) **अट क्रमांक 21 व 22** - प्रकल्प यंत्रणेने सार्वजनिक वापरासाठी रस्त्याचा वापर करण्यास परवानगी दयावी.

19) **अट क्रमांक 23**- प्रकल्प यंत्रणेने वरील अटींबाबत स्वयंपुर्तता अहवाल प्रत्येक सहा महीन्यांनी 1 जानेवारी आणि 1 जुलै ला केंद्र शासन व केंद्रस्थ अधिकारी नागपूर यांचेकडे करणे आवश्यक राहील.

20) **अट क्रमांक 25**- पर्यावरण व वन मंत्रालयाने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळो वेळी घातलेल्या व घालणेत येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

21) **अट क्रमांक 26**- प्रकल्प यंत्रणेने या प्रकल्पाकरीता लागू असलेले विविध अधिनियम, नियम व अटी तसेच मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

22) **अट क्रमांक 27** - पर्यावरण व वन मंत्रालयाचे पत्र दिनांक 7/5/2015 मधील मार्गदर्शन सुचनांनुसार काम सुरु करणेस परवानगी देणेची कार्यवाही आपलेकडील पुर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर वरीष्ठांकडून करण्यात येईल.

वरील प्रमाणे सर्व रक्कम www.forestclearance.nic.in या संकेत स्थळावर लॉगईन करुन चलन जनरेट करुन भरणा करावी व भरणा केलेले चलनाची प्रत या कार्यालयास पुर्तता अहवाला समवेत पाठविण्यात यावी. अट निहाय पुर्तता अहवाल आवश्यक हमीपत्रांसह (Undertakings) **सहा प्रतीत** या कार्यालयास सादर करावा.

आपणाकडून वरील अटींची पूर्तता करणेत आलेवर सदर प्रस्तावास अंतीम मान्यता घेणेकामी अहवाल वरीष्ठांमार्फत केंद्रशासनाकडे सादर करणेत येईल.

वरील प्रस्तावांत केंद्रशासनाकडून व राज्य शासनाकडून अंतीम मान्यता प्राप्त होत नाही तो पर्यंत कोणत्याही प्रकारे वनेत्तर कामे करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषीत.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- वनक्षेत्रपाल उरण यांचेकडे माहितीसाठी व जरुरी कार्यवाहीस रवाना.

2/- त्यांनी अट क्रमांक 9 नुसार जर आवश्यकता असेल तर व्यापक मृदसंधारणाचे काम आवश्यकत्या त्या त्या ठिकाणी घेणेबाबत मोका पहाणी करुन त्यानुसार अंदापत्रक तयार करुन प्रकल्प यंत्रणेस उपलब्ध करुन द्यावे.